बुधवार, दि ९ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/



# कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रम

## गुरू गणेश भवनमध्ये स्वीकारणार शुभेच्छा

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त जालना शहर व मतदार संघात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, बुधवार रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत गोरंटयाल हे श्री गुरु गणेश भवनमधील सभागृहात उपस्थित राहून वाढदिवसा निमित्त शुभेच्छा स्वीकारणार आहेत. उद्या दि.९ एप्रिल बुधवार रोजी सकाळी ८ वाजता शहरातील पाताल हनुमान मंदीरात माजी आमदार कैलास गोरंटयाल व सौ. संगीताताई गोरंटयाल यांच्या हस्ते पूजा आणि आरती करण्यात येणार असून ९ वाजता पांजरा पोळ मध्ये चारा वाटप, ९.३० वाजता जुना जालना भागातील कचेरी रोडवरील मारोती मंदिरात अखंड जलधारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौकातील श्री गुरु गणेश भवन मधील सभागृहात उपस्थित राहून वाढदिवसा निमित्त शुभेच्छा स्वीकारणार आहेत. दुपारी ३ ते ४ ही वेळ राखीव ठेवण्यात आली असून सायंकाळी ४ ते उशिरापर्यंत आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जलसम्राट केसरी कुस्ती स्पर्धा स्थळी उपस्थीत राहणार आहेत. दि.१० एप्रिल गुरुवार रोजी सकाळी १० वाजता सेवानिवृत्त उपअभियंता एस. एन.कुलकर्णी यांच्या भाग्यनगर मधील निवासस्थानी गोरंटयाल यांचा सत्कार करण्यात येणार आहे.११ वाजता पांजरा पोळ येथे चारा वाटप, दुपारी १२ वाजता अंबड चौफुली येथील राधाबाई अनाथालयात विद्यार्थ्यांना फळ वाटप, १ वाजता घाटी रोडवर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा पुस्तक वाटप, रात्री ८ वाजता जुना जालना भागातील शास्त्री मोहल्ला येथील दक्षिणमुखी हनुमान मंदीरात गोरंटयाल यांच्या हस्ते महाआरती करण्यात येणार आहे. शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता रामनगर साखर कारखान्याजवळील सोमनाथ फाटा येथे पानपोईचा शुभारंभ गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात येणार असून रात्री ८ वाजता शहरातील नूतन वसाहत परिसरात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.इंदोरीकर महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.दरम्यान, माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित करण्यात कार्यक्रमांना कार्यकर्ते,पदाधिकारी, माजी नगरसेवक,जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि हितचिंतकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पेवा शाळेतील शिक्षकांनी साकारले विज्ञानाचे स्वप्न! जिद्द, एकजूट आणि स्वयंप्रेरणेचा उत्कृष्ट नमुना!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पेवा येथे नुकतेच विज्ञान प्रयोगांसाठी अत्यावश्यक आणि मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध झाले. हे साहित्य केवळ मौल्यवानच नाही, तर विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. विज्ञानिष्ठ अभ्यासक्रमामध्ये अशा काही अनेक गोष्टी आहेत की ज्या सिद्धांतिक दृष्ट्या सांगता येतात परंतू प्रत्यक्ष अनुभव हा घेता येत नाही. त्यासाठीच गरज असते ती प्रयोगशाळेची ; आणि हाच विचार डोळ्या समोर ठेऊन प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय घेतला. मात्र, शाळेत असलेल्या जागेची मर्यादा आणि अतिरिक्त कक्षाची उपलब्धता नसल्यामुळे या साहित्याची सुरक्षितता एक मोठी समस्या बनली होती.

या आव्हानात्मक परिस्थितीत पेवा शाळेतील शिक्षकांनी हार मानली नाही, तर एक अनोखा आणि प्रेरणादायी मार्ग शोधून काढला. शाळेतील एका वर्गखोली समोरील अंदाजे १० बाय १२ फुटांची मोकळी जागा त्यांनी या विज्ञान साहित्यासाठी समर्पित करण्याचा निर्णय घेतला. पण केवळ जागा निश्चित करून ते थांबले नाहीत! तर प्रत्यक्षात आणण्यासाठी धावपळ सुरू झाली.

शालेय उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री अशोक भावसार सर यांच्याकडे हा विषय मांडण्यात आला...त्यांनी सुद्धा आमची तळमळ पाहून आम्हाला खर्च करण्यास परवानगी दिली.शाळेतील उच्च विभूषित शिक्षक डॉ.गोपाळ तुपकर सर आणि ज्ञानोबा मुरमुरे यांनी सुद्धा आम्हाला प्रेरणा दिली.. तद्नंतर विज्ञान कक्ष उभारणीसाठी लागणारे आवश्यक साहित्य जमा केले. त्यानंतर सुरू झाला विज्ञान कक्ष बनवण्याचा प्रवास!

विशेष म्हणजे, या कामासाठी शिक्षकांनी कोणताही व्यावसायिक कारागीर न बोलवता स्वतःच्या कौशल्याचा आणि एकत्रित प्रयत्नांचा वापर केला. त्यांच्यातील



एकोपा आणि शाळेप्रती असलेली निष्ठा यातूनच हे स्वप्न साकार झाले आहे. आता या विज्ञान कक्षामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रयोग करण्यासाठी एक हक्काची आणि प्रेरणादायी जागा मिळेल तसेच हे मौल्यवान साहित्य सुरक्षित पण राहील. या कक्षात विविध उपकरणे मांडली जातील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान शिकण्याची संधी मिळेल. शाळेच्या नियमित वेळेनंतर आणि आपल्या बहुमोल वेळेत नवनियुक्त शिक्षणसेवक श्याम दत्तराव सरकटे ,प्रकाश नालेगावकर आणि समाधान बोरुडे या तिघांनी आपल्या बुद्धीची चुणूक दाखवून कामाला सुरुवात केली. अर्थात

पान २ वर

# गोव्यातील प्रांतीय परिषदेत जालना लॉयन्स क्लबला १८ पुरस्कार प्रदान करून सन्मान



**जालना । प्रतिनिधी -** गोवा येथे पार पडलेल्या लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच टू च्या वार्षिक प्रांतीय परिषदेत लायन्स क्लब ऑफ जालनाला मानाचे १८ पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला.

या गौरवशाली सोहळ्याला इंटरनॅशनल डायरेक्टर पंकज मेहता, माजी आंतरराष्ट्रीय संचालक नवल मालू, बहुप्रांतीय चेअरपर्सन सुनील देसरडा, प्रांतपाल गिरीश सीसोदिया व प्रांतीय फर्स्ट लेडी संगीता सीसोदिया यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व माजी प्रांतपाल, कॅबिनेट सदस्य, क्लब अध्यक्ष व सचिव व प्रांतातील ६०० हून अधिक सदस्यांची उपस्थिती होती.

सेवाकार्यात सदैव अग्रेसर असलेल्या लायन्स क्लब जालनाने आपल्या उत्कृष्ट कार्याबद्दल मानाचे एकूण १८ पुरस्कार पटकावले. यामध्ये क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा यांना विशेष इंटरनॅशनल पिन प्रदान करत इंटरनॅशनल डायरेक्टर पंकज मेहता यांच्या

पान २ वर

# जिल्ह्यात ५ केंद्रावर एमएचटी-सीईटी सामाईक परीक्षेचे आयोजन

**जालना-** जिल्ह्यात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, बी.प्लानिंग व कृषी तंत्रज्ञान या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जिल्ह्यातील ५ परीक्षा उपकेंद्रावर दोन सत्रात दि.९ ते १७ एप्रिलपर्यंत पीसीबी तर दि. १९ ते २७ एप्रिल २०२५ या कालावधीत पीसीएम ग्रुपची एमएचटी-सीईटी सामाईक परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी दिली आहे. जाफ्राबाद येथील ड्रीम फ्युचर, साई कॉम्प्युटर, जालना येथील जेईएस महाविद्यालय व मस्त्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालय, नागेवाडी येथील शासकीय तंत्रनिकेतन आणि बदनापूर येथील व्ही.एस.एस. इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी या उपकेंद्रावर परिक्षा आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा उपकेंद्रावर भेटी देणे व उपकेंद्रावरील अनुचित प्रकारास प्रतिबंध करण्यासाठी उपविभागीय अधिकारी जालना यांची उपविभागीयस्तरावर तसेच संबंधित तहसीलदार यांची तालुकास्तरावर भरारी पथकप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यालयीन स्तरावर वर्ग-१ व वर्ग-२ चे ४ अधिकारी यांची निरीक्षक म्हणून तसेच वर्ग-३ व व र्ग-४ चे ३ कर्मचारी सहाय्यक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

युवा आदर्श

## वळचणी ...

नोकरीत वनितेच्या
जाणू घ्या अडचणी
प्रश्न त्यांचे असंख्य
पडले असे वळचणी
हौसेस्तव नोकरी ही
करे कुणी हेटाळणी
वासना पूर्ण नजराही
करी कधी टेहाळणी
पदोन्नती देता तिला
लावी कडक चाळणी
इतर जातात सरासर
चोथा झेलते गाळणी
कार्य कौशल्य असून
मीठ लागते अळणी
घर कामातचं शोभता
करा पिठाची मळणी
मनाजोग्यां बदलीस
महिलेचीचं ना वर्णी
हलकी कामे वाटेला
उच्च पदावर धोरणी
समानता नगारे वाजे
कागदोपत्री बतावणी
विरोध अतिउग्र होई
स्त्रि दाक्षिण्य दावणी
बहुआघाडी सांभाळी
कौतुक करुनये कुणी
शाबासकी इतकी पुरे
निदान म्हणू नये उणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संपादकीय

## जागतिक कोकणी भाषा दिन

आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## डॉ. सरिता हिवराळे यांना पीएचडी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद येथील डॉ. सरिता विनोद हिवराळे (बावस्कर) यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएचडी पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी



सिद्धार्थ कॉलेज जाफराबादचे प्रा. मोहन बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली फायनान्शिअल एनालिसिस ऑफ नॉन परफॉर्म असेट ऑफ सिलेक्टेड शेड्युल कमर्शियल बॅकइन मराठवाडा रीजन या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. यासाठी त्यांना कॉमर्स डिपार्टमेंट च्या हेड अँड चेअरमन डॉ.हुंबे यांचेही मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाचे सिल्लोड शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष दादासाहेब म्हस्के, सचिव राहुल म्हस्के, प्राचार्य रमेश देशमुख, प्राध्यापक वैद्य, प्रा. एस.पी.वाघमारे, प्रा. ए. डी. ब्रम्हराक्षस, समर्थ कॉलेजचे प्राचार्य मुकुंद खरात आदींनी कौतुक केले आहे

# धर्मदाय रुग्णालयांवर नजर ठेवून सरकारने सामान्यांसाठी योग्य सुविधा उपलब्ध कराव्यात

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशाअभावी उपचार नाकारल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता.त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी धर्मदाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले आहेत.पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरून पुण्यात रूग्णालयाच्या बाहेर विविध संघटनांकडुन आंदोलन करण्यात आले होते.असे सांगितले जाते की १० लाख रुपये जमा न केल्यामुळे महिलेला रूग्णालयात भर्ती करण्यास रूग्णालय प्रशासनाने मनाई केल्याचे सांगितले जाते.यानंतर त्या महिलेने दोन जुळव्या मुलांना जन्म दिला व तीचा यात मृत्यू झाला.यावर राज्य शासनाने ताबडतोब घटनेची गांभीर्याने दखल घेतली व या प्रकरणातची चौकशी करण्यासाठी पाच जणांची समिती गठीत करण्यात आली आहे.यानंतर आता रूग्णालयाकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून यानंतर रूग्णांकडून डिपॉझिट घेतले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक प्रकारचे उपचार रूग्णांवर होतात. त्यामुळे सर्व चूक रूग्णालयाची आहे असे म्हणून चालणार नाही.परंतु या केसमध्ये नक्कीच असंवेदनशीलपणा दाखविण्यात आला आहे ही बाब तेथील झालेल्या घटनेवरून स्पष्ट दिसून येते. कारण गर्भवती महिलेचा मृत्यू अंगावर शहारे येणारा आहे. त्यामुळेच तेथील नागरिक किंवा आप्त आक्रमक झालेत. कोणतेही रूग्णालयात असो रूग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या वेदना घेऊन येत असतो.कारण कोणत्याही रूग्णांची आपात्कालीन प्रकृती खराब झाली तर आपल्या परिस्थितीनुसार खाजगी किंवा सरकारी किंवा धर्मदाय रूग्णालयाकडे धाव घेऊन रूग्णांवर आपात्कालीन परिस्थितीत ताबडतोब उपचार व्हावेत अशी इच्छा संपूर्ण रूग्णांच्या नातेवाइकांची असते. अशा परिस्थितीत रूग्णांचे परिवार आपल्या ऐपतीप्रमाणे पैसा गोळा करून त्या-त्या रूग्णालयात उपचार घेतात.परंतु आपण जेव्हा धर्मदाय रूग्णालयाची परिभाषा करतो तेव्हा आपात्कालीन परिस्थितीत कोणताही रूग्ण असो त्यावर रूग्णालय प्रशासनाने ताबडतोब उपचार करायला हवेत.कारण हा जिवन मरणाचा प्रश्न असतो.कारण यात थोडीशी चूक किंवा वेळ झाला तर तो रूग्ण दगावतो आणि हाच प्रकार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झाला.आपण डॉक्टरांना दैवी शक्ती असल्याचे मानतो त्याचपध्दतीने रूग्णालय प्रशासनाने तत्परता दाखविने गरजेचे असते. रूग्णालयाला सुध्दा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो यात दुमत नाही.कारण स्टाफ कमी असने अशाप्रकारे अनेक अडचणी त्यांच्या समोर सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही. परंतु दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अशा घटनांमुळे राज्यात एक वेगळाच संदेश जातो.कारण राज्यात तब्बल ४७६ धर्मदाय रूग्णालये (ट्रस्ट हॉस्पिटल) आहेत. त्यामुळे आता आरोग्य विभाग व सरकारची जबाबदारी आहे की या संपूर्ण रूग्णालयाची काय अवस्था आहे किंवा रूग्णालय प्रशासनाच्या काय-अडचणी आहेत किंवा या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार होतो की नाही किंवा हयगय तर होत नाही ना!या संपूर्ण गोष्टींवर आता सरकारने करडी नजर ठेवण्याची गरज आहे.या संदर्भात माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्वांना आश्वस्त केले की भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी एक निश्चित कार्यपद्धती (एसओपी)तयार करण्याचे काम सुरू आहे.याचे मी मनापासून स्वागत करतो.कारण पुढे अशा घटना होणार नाही याची ताबडतोब दखल मुख्यमंत्री महोदयांनी घेतली.पुण्यातील घटना पहाता राज्यातील संपूर्ण सरकारी रूग्णालयाने, निमसरकारी रूग्णालयाने, धर्मदाय रूग्णालयेसह खाजगी रुग्णालयांनी आपात्कालीन परिस्थितीत रूग्णांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालये मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करतात यावर सुध्दा सरकारने अंकुश लावने गरजेचे आहे.कारण शेवटी माणूस हा माणूस असतो त्यामुळे धर्मदाय रूग्णालयांसोबतच खाजगी रुग्णालयांनी सुध्दा माणुसकी या नात्याने गरीब-निर्धन व सर्वसामान्यांना सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले तर ही खरी मानव सेवा समजली जाईल.कारण महागाईच्या काळात गरीब व सर्वसामान्यांना सर्वच बाबतीत मोठी कडवी झुंज द्यावी लागते या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून संपूर्ण रूग्णालयांनी माफक दरात उपचार करण्यास स्वतःहुन तत्परता दाखवली तर अनेकांना जिवदान मिळेल व डॉक्टरांची दैवी शक्ती दिसून येईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

## पान १ वरुन

### पेवा शाळेतील शिक्षकांनी ...

सुतारकाम करणे हे विशेष कौशल्य श्याम सरकटे यांच्याकडे असल्यामुळे मोकळ्या जागेत एका सुंदर आणि सुसज्ज विज्ञान कक्षाची निर्मिती झाली.

आजच्या या विज्ञानकक्ष उद्धाटन सोहळ्या प्रसंगी उस्वद केंद्राचे केंद्रप्रमुख दिनकर खरात साहेब,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्याम कौटकर ,माजी अध्यक्ष संजय सोनटक्के,प्रसाद वरणकर, विलास वरणकर, अमोल थोरात, सिरामे बंधू, गावातील ग्रामस्थ व शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. उद्धाटन प्रसंगी माननीय केंद्र प्रमुख यांनी प्रयोगातून विज्ञान शिकताना विद्यार्थ्यामध्ये विज्ञानाची कशी आवड निर्माण होते या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले . तसेच मा. मुख्याध्यापक अशोक भावसार सर व डॉ.गोपाळ तुपकर यांनी सुद्धा मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश नालेगावकर यांनी केले. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षकांची एकजूट दिसून आली. यासाठी मा.गटशिक्षणाधिकारी विपुलजी भागवत तसेच गटसमन्वयक काशिनाथ राठोड व केंद्रप्रमुख दिनकर खरात यांनी अभिनंदन केले.

### गोव्यातील प्रांतीय ...

हस्ते गौरविण्यात आले. याशिवाय जयश्री लढ्ढा यांना बेस्ट प्रेसिडेंट, मंजू श्रीमाली यांना बेस्ट सेक्रेटरी, अतुल लढ्ढा यांना बेस्ट डिस्ट्रिक्ट मार्केटिंग आणि बेस्ट इन्फॉर्मेशन, मीनाक्षी दाड यांना बेस्ट डिस्ट्रिक्ट जीएसटी, राजेश लुनिया यांना बेस्ट झोन चेअरपर्सन, कमलकिशोर झुनझुनवाला यांना बेस्ट इनोव्हेटिव प्रोजेक्ट, प्रकाश कुंडलकर यांना लायन आयडोल, जयप्रकाश श्रीमाली यांना बेस्ट डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सांघिकमध्ये जालना लॉयन्स क्लबला बेस्ट फीड द हंगर अवॉर्ड, बेस्ट व्हिजन अवॉर्ड, लायन्स इमेज बिल्डिंग व पब्लिक रिलेशन, बेस्ट बॅनर प्रेझेंटेशन, बेस्ट फोटो डिस्प्ले, बेस्ट स्क्रॅप बुक, बेस्ट चाईल्डहुड कॅन्सर प्रोजेक्ट, बेस्ट जीएसटी अवॉर्ड, बेस्ट डीजी व्हिजिट अवार्ड प्रदान करण्यात आले. यावर्षी लायन्स क्लब जालनाने अनेक सेवाकार्यं राबवून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. यामध्ये १०२४ मुलींना गर्भमुख कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण, वर्षभर चाललेली डोळ्यांची तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, दंत तपासून शिबिरे, गरजूंना अन्नदान, मोफत स्वर्ग रथ सेवा, तसेच दृष्टी रथ व नेत्रालयाच्या माध्यमातून परतूर भागात सतत सेवा दिली जात आहे.

या सर्व यशामागे अध्यक्ष जयश्री लढ्ढा, सचिव मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी आणि संपूर्ण क्लब टीमचे योगदान मोठे आहे. त्यांची समर्पित भावना, नेतृत्वगुण आणि संघभावनेने क्लबने ही प्रतिष्ठा मिळवली आहे.

या प्रांतीय परिषदेला जालन्यातून माजी प्रांतपाल विजय बगडिया, पुरुषोत्तम जयपुरीया, माजी आमदार कैलाश गोरंट्याल, संगीता गोरंट्याल, बद्रीनारायण बियाणी, द्वारकादास मुदंडा, विजय दाड, दिनेश लोहीया, राजेश देवीदान, आशा बगडिया, सुनील बियाणी, इंद्रराज केदारे , विनोद कुमावत, रतन बजाज, कविता बजाज, विनय कोठारी, छाया कोठारी, अशोक मिश्रा, हिम्मतराव शिंदे, शैलजा शिंदे, राधेश्याम टिबडेवाल, गेंदालाल झुंगे, सुनील भगत, दीपक काकडे या मान्यवरांसह सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि ९ एप्रिल २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com



# डॉ.वसंत भोसले यशस्वी माजी परीक्षा नियंत्रक आणि प्राचार्य - डॉ. सर्जेराव निमसे

**परभणी । प्रतिनिधी -** प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांचे अध्ययन,अध्यापन कार्य आणि परीक्षा नियंत्रक,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. प्राचार्य, कै.सौ.कमलताई जामकर महिला म हाविद्यालय,परभणी येथील प्रशासकीय कार्य दिशादर्शक, विकासाभिमुख राहीले आहे. जिद्दी, जिज्ञासू , अभ्यासू ,धडाडीचे कार्यकर्ते स्पष्टवक्ते , शिस्तप्रिय असे वसंत भोसले व्यवस्थापन परिषद सदस्य असताना सभागृहात उभं राहून पोटतिडकीने सामान्यांच्या प्रश्नांबाबत आक्रमक भूमिका घेत असत. एखादा प्रश्न हाती घेतल्यानंतर त्याचा सकारात्म कच निकाल त्यांना अपेक्षित असे तसे नियमही सभागृहात ते सांगत असत. आणि संबंधिताला न्याय मिळवून देत असत.चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांचे योगदान अभ्यासपूर्ण व दिशादर्शक राहीले आहे. असे गौरवोद्गार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांनी व्यक्त केले.

नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित कै.सौ. कमलताई जामकर म हिला महाविद्यालय, परभणी येथे सेवा गौरव समिती च्या वतीने आयोजित सेवा गौरव सोहळ्यात डॉ.सर्जेराव निम से प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हेमंतराव जाम कर ( अध्यक्ष नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था, परभणी.) प्रमुख अतिथी संस्थेचे उपाध्यक्ष ड.किरणराव सुभेदार, सचिव विजयसिंह जामकर, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ . डी एन मोरे, इंजि.नारायणराव चौधरी,यांचे सह प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे,प्रा.डॉ.दिनानाथ फुलवाडकर, सिनेट सदस्य डॉ राजगोपाल कालानी, अशोक गुजराथी, डीन डॉ.डी.एम. खंदारे, डॉ. चंद्रशेखर बाविस्कर, उपकुलसचिव रवी सरोदे, संचालक, डॉ.हुशारसिंग साबळे, माजी कुलसचिव डॉ.सर्जेराव शिंदे, प्राचार्य डॉ.अविनाश सरनाईक, प्राचार्य डॉ. अजय पाटील, प्राचार्य डॉ.सुरेश सदावर्ते, देविदासराव वालतूरे, दिलीपराव म स्के,संजय जाधव,सौ. मृणालिनी हर्षवर्धन सपकाळ, सत्कारमुर्ती डॉ. वसंत भोसले, सौ.उषाताई भोसले, प्रभारी प्राचार्य डॉ. संगीता आवचार आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कै. सौ. कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करून कार्यक्रम ाची सुरुवात करण्यात आली.

सेवा गौरव समिती च्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ.संगीता आवचार यांनी केले. डॉ सर्जेराव निमसे यांचा परिचय प्रा. डॉ.अंबादास कदम यांनी करून दिला.

डॉ.वसंत भोसले यांचे विषयी डॉ. संजय पाटील , डॉ...पवार, मंजुषा याज्ञिक, डॉ.पल्लवी वालतूरे, मृणालिनी सपकाळ, डॉ. रवी सरोदे , डॉ. डी.एम. खंदारे ,प्राचार्य बी.यु. जाधव, डॉ .डी. एन.मोरे , प्राचार्य डॉ .आत्माराम टेंगसे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.



संस्थाध्यक्ष हेमंतराव जामकर यांनी नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी च्या वतीने प्रमुख अतिथी,माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांचा अमृत महोत्सवी वर्षात पदार्पणा निमित्त शाल, पुष्पहार, सन्मान चिन्ह, भेटवस्तू ,मायेची सावली ग्रंथ भेट देवून सत्कार केला. डॉ.सर्जेराव निमसे यांचे हस्ते शाल, पुष्पहार,मानपत्र, मानचिन्ह, देवून सत्कार मुर्ती प्राचार्य डॉ. वसंत भोसले यांचा तर डॉ.संगीता आवचार यांनी सौ.उषाताई भोसले यांचा गौरव केला.

स्व. रावसाहेब जामकर साहेब आणि डॉ.सर्जेराव निमसे सर यांनी संधी देत विश्वास ही दिला.त्यामुळे मी हे सारं काही करु शकलो. वर्तमान व्यवस्थापन मंडळातील अध्यक्ष हेमंतराव जामकर, उपाध्यक्ष ड. किरणराव सुभेदार ,सचिव विजयसिंह जामकर व सर्व सन्माननीय पदाधिकारी, संचालक,आणि सदस्य यांनी दिलेले स्वातंत्र्य आणि अधिकारा मुळे मी महाविद्यालया साठी माझ्या सहकाऱ्यांचे मदतीने प्रगती कार्य करु शकलो. डॉ. सर्जेराव निमसे सरांनी विद्यापीठाम ध्ये मला संधी दिली त्या संधीच सोनं करण्यासाठीचा विश्वास दिला.त्यामुळे आजचा हा आनंदायी क्षण मी अनुभवतो आहे. आयुष्याच्या यशस्वीतेत माझी धर्मपत्नी उषा भोसले यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.मला यशस्वी होण्यासाठी परिवारासह , महाविद्यालय आणि विद्यापीठाने बऱ्याच काही संधी दिल्या त्यामुळे मी हे कार्य करू शकलो असे मत सत्कारमूर्ती डॉ.वसंत भोसले यांनी व्यक्त केले.

प्रसंगी संस्थेचे सचिव विजयसिंह जामकर यांनी भोसले परिवाराला शुभेच्छा दिल्या. वसंत भोसले कधीच टायर आणि रिटायर होणारे व्यक्ती नाहीत. शिस्तप्रिय प्रशासनातून त्यांनी महाविद्यालयाच्या विकासात भर घातली. शिस्ती शिवाय माणसाच आयुष्य बहरास येत नाही याची साक्ष देणारी भोसले सरांची कार्यशैली आणि आज मान्यवरांची हजेरी कौतुकास्पद आहे. शेतीतून काही लाभ व्हावा अशी आशा न बाळगता ती समाधाना साठी करावी असा मोलाचा सल्ला निमसे सरांनी दिला भोसले सरांनी आपले आयुष्य सहज सुंदर करण्यासाठी याही पुढे कार्यरत राहावे असा आशावाद अध्यक्षिय समारोपात ड.किरणराव सुभेदार यांनी व्यक्त केला.

सेवा गौरव सोहळ्या साठी कृष्णा दळणर,प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, डॉ. के.के.पाटील,डॉ बबन पवार, डॉ. श्रीरंग खिल्लारे,डॉ. श्रीधर भोंबे, डॉ .प्रभाकर हरकळ, डॉ.वसंत सातपुते,डॉ.श्रीधर कोल्हे, डॉ.भास्कर मुंढे,डॉ राम फुने, डॉ. अशोक चिंदूरवार, डॉ.विलास पाटील,डॉ .विलास आघाव, डॉ.संजय अग्रवाल, आदींसह डॉ संजय नरवाडे, डॉ. शत्रुघ्न जाधव, डॉ. पी टी पवार, डॉ .शिवाजी डोंगरे , डॉ.बालासाहेब पवार,

मानपत्राचे लेखन प्रा.अरुण पडघन यांनी केले. तर मानपत्र वाचन प्रा.डॉ. सुनिल मोडक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रा.अरुण पडघन यांनी केले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**जालना -**सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ पर्यंतच्या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. तरी विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी केले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसाम ान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहामध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन, भारतीय संविधानाची उद्देशिका, प्रस्ताविका यांचे वाचन, भारतीय जनतेत संविधानाविषयी जनजागृती निर्माण करणे, विविध स्पर्धा, कार्यशाळा, मेळावा, व्याख्यान आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जालना मार्फत जिल्हा युवा पुरस्कारासाठी युवक कल्याण क्षेत्रात कार्य करणारे युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांच्या कार्याचे, योगदानाचे म ूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनाकडून जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो. तरी जालना जिल्ह्यातील युवक, युवतींनी व नोंदणीकृत संस्थांनी २०२३-२४ साठीच्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.


जिल्हा युवा पुरस्कार जिल्ह्यातील १ युवक व १ युवतींना प्रत्येकी रोख रक्कम रूपये १०,०००/-, गौरवपत्र सन्मानचिन्ह तसेच संस्था ह्या सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रॅस्ट क्ट १९५० नुसार पंजीबध्द असाव्यात. संस्थेसाठी पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम रूपये ५०,०००/-, गौरवपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सन २०२३-२४ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०२२ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२४ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक, युवतींनी व नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथून अथवा www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १२ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घेऊन आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यालयीन वेळेत स्पीड पोस्टाने सादर करावेत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे (७७५८८६३९९१), क्रीडा मार्गदर्शक सिध्दार्थ कदम (८९७५३३३५९४) अथवा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.






# महावीर जयंतीनिमित्त अहिंसा मोटारसायकल रॅली; भव्य शोभायात्रा, प्रवचन आणि रक्तदान शिबिर

**जालना । प्रतिनिधी -** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सकल जैन समाजाच्यावतीने भगवान महावीर जन्म कल्याणक म्हणजेच महावीर जयंतीनिमित्त आचार्य श्री १०८ पवित्रसागर म हाराज यांचे परमशिष्य १०८ प्रभावसागरजी महाराज, प. पू. जीनशाशन प्रभाविका प्रशांतकवरजी म. सा., प पू कुसुमप्रभाजी म. सा., प. पू. प्रसन्नाजी म.सा. आदि ठाणा ३ यांच्या पावन सानिध्यात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



बुधवार दि. ९ एप्रिल रोजी जैन युथ क्लब व सकल जैन समाज जालना यांच्यावतीने दुपारी ३. ३० ते ५. ३० या वेळेत गुरु गणेश भवन येथून भव्य अहिंसा मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. गुरु गणेश भवन, उडपी चौक, सराफा, पाणी वेस, श्री मंमादेवी मंदिर, गांधी चमन, जुना जालना जैन मंदिर आणि परत शनी मंदिर, मम्मादेवी मंदिर, मॅजेस्टिक टॉकीज, भगवान महावीर चौक, मामा चौक, बालाजी गल्ली, शोला चौक, बडी सडक ते ग्रुप गणेश भवन असा या रॅलीचा मार्ग राहणार आहे. सायंकाळी ७ वाजता गणेश तपोमंडपात शहरातील सकल जैन समाज शाळेतील लहान मुलांचा धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे..

गुरुवार दि. १० एप्रिल रोजी महावीर जयंतीनिमित्त सकाळी ८.३० वाजता म हावीर चौकात ध्वजारोहण आणि त्यानंतर ८.४५ वाजता तेथून भव्य शोभा यात्रेला सुरुवात होणार आहे. मॅजेस्टिक टॉकीज रोड, पाणी वेस, काद्राबाद, फुल बाजार, अहिंसा मार्ग, शोला चौक, जवाहर बाग, बडी सडक, श्रीराम मंदिर मार्गे येऊन या शोभायात्रेचा समारोप गुरु गणेशनगर येथे होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता संत आणि साध्वींचे मंगलमय प्रवचन होईल. ११.३० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मिरवणूक व इतर सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे सहभागी व्हावे, असे आवाहन सकल जैन समाजाच्यावतीने संजय लव्हाडे, विजय जैन, महावीर रुणवाल, चैतन्य वायकोस, मनोज मोदी, प्रमोद देसरडा, प्रवीण पहाडे, शिखर लोहाडे, सुदेश सकलेचा, अशोक बिनायकीया, त्रिभुवनदास सिंघवी, ड. अनिल संचेती, प्रकाश नेवे, माणिकचंद कासलीवाल, सुनील सेठिया, सुरेशचंद मुथा, योगेश पाटणी, सुधीर पहाडे, परेश धोका, उत्तमचंद बनवट, अजित छाबडा, नरेंद्र पहाडे, प्रेमचंद कासलीवाल, संतोष बडजाते, जिनदास वायकोस, सुभाष वायकोस, सुरेश मरलेचा, नरेंद्र बोरा, संजय मुथा, डॉ.धरमचंद गादिया, पंकज पाटनी, विजय सावजी, कचरूलाल कुंकुलोल, प्रकाश सुराणा, गणेश काले, स्वप्नील लव्हाडे, श्रीपाल मरलेचा, चेतन बोथरा, पंकज खिंवसरा, महेंद्र गादिया, आकाश बोथरा, अजय बोरा, रवींद्र संचेती, गौतम संचेती आदींनी केले आहे.

### गुरुगणेश भवनात सामूहिक नवकार जप

विश्वकल्याणासाठी बुधवारी (ता. ९) विश्व नवकार महामंत्र दिवस साजरा करण्यात येणार आहे. यात १०८ देशांतील लाखो भाविक एकाच वेळी महामंत्र म्हणणार आहेत. याअंतर्गत जालना येथे जीतो विंग जालना व सकल जैन समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ८ ते ९.३० वाजेदरम्यान गुरु गणेश भवनात नवकार महामंत्राचा सामूहिक जप करण्यात येणार आहे. हा ऐतिहासिक दिवस सुवर्णाक्षरांनी कोरला जाणार असल्याने जागतिक शांतता आणि एकतेसाठीच्या या उपक्रमाचे सर्वांनी साक्षीदार बनावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सत्यशोधक विद्यालयाचा विद्यार्थी पंजाब नॅशनल बँकेत झाला कृषी अधिकारी



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** मानव विकास व पुनर्निर्माण संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, गोषेगाव ता.भोकरदन जि. जालना या विद्यालयातील पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी नामांकित शासकीय निमशासकीय विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे यापैकी वजीरखेडा येथील विद्यार्थी बाबासाहेब कचरू फुके पंजाब नॅशनल बँक मध्ये कृषी अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.सुनीलजी वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर यांनी त्याचे स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी विद्यालयातील पर्यवेक्षक इफरोज पठाण, निलेश कंकाळ तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अंबड व घनसावंगी येथील शेतकऱ्यांनी विशेष न्यायालयाचा लाभ घ्यावा - पुलकित सिंह

**अंबड । प्रतिनिधी -** अंबड व घनसावंगी तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये अनेक वाद उद्भवलेले दिसून येत आहे. अनेक वाद बांधावरून आणि रस्त्यावरून होत असल्याचे अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने असून अनेक महिन्यापासून प्रकरणे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना अनेक दिवसापासून रस्त्या संदर्भाचे आदेशाची प्रतीक्षा असून परंतु अधिकाऱ्यांना अनेक कामे असल्यामुळे प्रकरण प्रलंबित असल्याचे निदर्शनात आल्यामुळे मा.सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अंबड यांनी अंबड व घनसावंगी येथील अनेक प्रकरणे पांदन रस्ते, शेतरस्त्याची अडवणुक, अतिक्रमण व बंद केलेली असल्याने मोठया प्रम ाणात शेतक-यांना तसेच गावक-यांना त्याचा त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मोठया प्रमाणात शेतरस्त्याची प्रकरणे तहसील कार्यालय अंबड, घनसावंगी व उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे प्रलंबित आहेत. त्यामुळे सदरील प्रकरणांना गती प्राप्त होण्यासाठी दिनांक १५/०४/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात विशेष न्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.अंबड व घनसावंगी तालुक्यातील जनतेला सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अंबड श्री पुलकित सिंह यांनी आव्हान केले आहे की, सदर दिवशी पांदन रस्ते, शेतरस्त्याची प्रकरणे घेवुन उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड येथे सुनावणीस उपस्थित रहावे असे आव्हान करण्यात आले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात येण्या जाण्यासाठी रस्त्याची आवश्यकता असल्यामुळे अनेक नागरिकांनी रस्त्यासंदर्भातचे प्रकरणे दाखल केलेले आहे त्यामुळे नागरिकांना लवकरात लवकर त्यांचे प्रकरणे कसे निघाले काढावे यासाठी मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी विशेष न्यायालयाचे आयोजन करण्यात आलेले आहे त्यामध्ये दोन्ही पक्षकरांना आपले म्हणणे मानण्याचा परिपूर्ण अधिकार असून आणि तत्काळ आपले प्रकरण बंद करण्याचे आयोजित केले आहे ज्या नागरिकांनी रस्त्यासाठी आपल्या गावातील व आपल्या नातेवाईकांची नागरिकांना रस्त्या संदर्भात अनेक वाद निर्माण झालेली आहे हे वार मिटवून गुण्यागोविंदाने राहावे यासाठी विशेष न्यायालयाचे पक्षकांनी आवर्जून सहायता घ्यावी असे आवाहन विभागीय अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे अंबड व घनसावंगी येथील सर्वच पक्षकरांनी आवर्जून उपस्थित रहावे ज्यामुळे आपले वाद कायमस्वरूपी मिटून घ्यावे आणि आपले पांदण रस्ते, वहिवाट , शिव रस्ते, बंद केलेले रस्ते इतर प्रकरणे देखील मिटवून घ्यावे असे आव्हान करण्यात आले आहे.

# इग्नाईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस् फाउंडेशन यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी केले रॉकेट लॉन्चिंग

**मंठा । प्रतिनिधी -** भारतीय अंतराळ संस्था इस्रोच्या अंतर्गत चालणारी संस्था इग्नाईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस् फाउंडेशन (आयडीवायएम) यांच्या मार्गदर्शनाने मंठा येथील विद्यार्थी पुजा वायाळ आणि महेश वायाळ यांनी पर्यावरणास अनुकूल असे यशस्वीरित्या रॉकेट प्रक्षेपण केले. यावेळी पुजा वायाळ हिने सांगितले की, लहानपणी या सगळ्या गोष्टी टीव्ही व म ोबाईल वर पहात असे की कश्याप्रकारे रॉकेट प्रक्षेपित होतात. एक स्वप्न होत की मी एक दिवस भारत देशासाठी रॉकेट लाँच करेल आणि मी हे स्वप्न पूर्ण केलं. रॉकेट बनऊन त्याला यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. मी रॉकेट बनवताना ही काळजी घेतली की यामुळे कोणत्याही प्रकारचं प्रदूषण होणार नाही म्हणून तीने पोटॅशियम नाईट्रेट आणि शुगर फ्युलचा वापर करून हे रॉकेट बनवले. भारतातील युवापिढीने ही असच नाविन्यपूर्ण काम करून विकसित भारत मधे आपल्या माननीय प्रधानमंत्री यांच स्वप्न पूर्ण करण्यासाठी बहुमूल्य योगदान द्यावं. आयडीवायमचे रविशंकर कुमार यांनी यावेळी महेश वायाळ आणि पुजा वायाळ यांना शुभेच्छा दिल्या.



